Pri

CORPORATION I-IV

(5)

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका.
के. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र/खाप्राशा/ ७६ / २००४-०५
दिनांक ७/७/०५

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
आमीन.१. .एज्युकेशन .सो.याच्यीची.
इंग्लीश. मिडीयम.स्कूल.........
स.नं. १२ आंबेगाव बु।। पुणे-४६

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२(१०००/०२) प्राशि - ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया - वर्गांना सन २००४-०५ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे या २० रू. स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे माध्यम | वर्ग/ तुकडया मान्यता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी/मराठी माध्यम<br>इंग्रजी माध्यम | इयत्ता १ली अतिरिक्त दुसरी तुकडी जून २००[illegible]<br>इयत्ता २री प्रथम वर्ग जून २००४<br>इयत्ता ३री प्रथम वर्ग जून २००५ |

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Pri

ADDITIONAL DIVISIONS 07-08

कायम विना अनुदान तत्वावर (इंग्रजी माध्यम)


**पुणे जिल्हा परीषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन,**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**


**जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./ /३१४**
**/खा.प्रा.शा./ / दि. १/१०/०७**

प्रति :-
मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका
अभिनव एज्यु सोसायटीचे
इंग्लीश मेडीयम
स्कूल, आंबेगाव (बु)
पुणे – ४६

**विषय :-** **कायम -विना - अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खासगी प्राथमिक शाळांना जादा/ नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / जादा तुकडया/ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत......**

**संदर्भ :-** **शासन निर्णय क्रमांक -व्ही. एल. एस. १००२/ (१०००/०२) प्रा. शि. -३. दिनांक १४ जाने. २००३.**

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/ नैसर्गिक वाढीचा/ वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जुन २००८ पासून सन २००८ - २००९ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | अभिनव इंग्लीश मेडीयम स्कूल आंबेगाव (बु) पुणे -४६ | इंग्रजी | १ लीची ६वी, ७वी अतिरीक्त तुकडी<br>२री ची ४थी, ५वी, ६वी ७वी अतिरीक्त तुकडी<br>३रीची ४थी, ५वी अतिरीक्त तुकडी<br>४थीची ३री अतिरीक्त तुकडी | | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षनिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची आंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजुर करण्यात येणा-या तुकडीमध्ये परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/ तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९. शासन निर्णय दि. ५/२/२००० नुसार विद्यार्थ्याच्या मातेचे नाव जनरल रजिस्टर व शाळा सोडण्याच्या प्रमाणपत्रावर लिहणे बंधनकारक आहे.
१०. याचिका क्र. -४१५९/१९९८ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्राथ. शिक्षकासाठी डी. एड. हीच प्रशिक्षित अर्हता योग्य आहे.
यामुळे प्राथमिक शिक्षकपदी एच. एस. सी. डी. एड. अर्हतेचेच शिक्षक नियमानुसार नियुक्त करुन या कार्यालयाकडून त्यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

शिक्षणाधिकारी,(प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद, पुणे

कविता

प्रत : माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना

सचिव / अध्यक्ष
अभिनव एज्यु. सोसायटी
इंग्लीश मेडीयम स्कूल
आंबेगाव बु।

Pri

(B)

**कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )**

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./३०५/०८
/खा.प्रा.शा./८०/ दि ~~२/२०/०६~~
१५/१०/२००८

प्रति,
मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,
आभिनव एज्यु० सोसायटीचे,
इंग्लीश मिडीयम स्कूल, आंबेगाव बु॥

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम /जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल्.एस्.-२००२/ ( २०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २००८ पासून सन २००८ - २००९ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | आभिनव इंग्लीश मिडियम स्कूल, आंबेगाव, बु॥ | इंग्रजी | इ. ३री ची ६वी<br>इ. ४थी ची ५वी | व ७वी (अतिरिक्त)<br>व ५वी | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी. (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष , आभिनव एज्युकेशन सोसायटी, आंबेगाव बु॥

Sec

(3)

V - VIII in SECONDARY

00007/08

कायम विना अनुदान

जा.क्र. माध्य.३(१५)/५ ते ७/पुवि/२० -२८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 29 APR 2005

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, [redacted]

**विषय** : इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग प्राथमिक विभागाकडून माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यांस परवानगी बाबत...

**संदर्भ** : १. आपले पत्र क्रमांक : [redacted]
२. शासन निर्णय क्रमांक [redacted] ]माशि-१,
दिनांक २७/६. / २००३ .

उपरोक्त विषयाधिन संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नविन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यांस परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्रमांक एसएसएन-१०९७/५२८/९९/माशि-१, दिनांक १.३.१९९९ व शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००२/(२५६/०२) माशि-१, दिनांक २७.६.२००३ चे शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराचे अधिन राहून खालील अटींची पूर्तता करणेचे शर्तीवर [redacted] या संस्थेच्या [redacted] या माध्यमिक विद्यालयास इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग प्राथमिक विभागाकडून माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यांस [redacted] -२०० [redacted] या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यांत येत आहे.

१. इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग भविष्यामध्ये प्राथमिक शाळेस मंजूर केले जाणार नाहीत.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गांची तपासणी वार्षिक तपासणीच्या वेळी करावी व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत

Abhinav's English Medium School & Junior College
Ambegaon (BK)
Inward No:- 09
Date:- 05/05/2005
Clerk Principal

मा. प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी -

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,
३. प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ,
४. मुख्याध्यापक, [redacted]
५. निवडनस्ती

Sec

(1) CLASS VIII PERMISSION

तात्काळ

जून- २००३ पासून नुतनीकरण
कायम विनाअनुदान
इंग्रजी माध्यम

232610C

जा.क्र. माध्य. ३ (१४ ) /नमाशा/मान्यता/
पुवि / २००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.

दिनांक / 17 SEP 2003

प्रति,
सचिव, अभिनव एज्युकेशन सोसायटी,
धनकवडी, पुणे.

विषय - सन २००३- २००४ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ - शासन पत्र क्रमांक :
१] नमाशा-१००२ ४९९/२००२ माशि-१, दिनांक २९.६.२००२
२. शि.अ. [माध्य]जि. प. पुणे क्र. शिक्षण माध्य ह-४/ ५२२/०३ दि.४.९.२००३

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून ....२००३...... पासून विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) शासनाने विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालण करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देगणी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये

७) माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

इतर अटी -

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) सदर परवानगी दिलेल्या शाळेच्या संस्थेविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येई

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | अभिनव एज्युकेशन सोसायटी, ~~आंबेगाव~~ धनकवडी, पुणे. | आंबेगांव ता. हवेली जि. पुणे. | आठवी | इंग्रजी |

टिप: जून- ~~२००२~~ २००३ पासून नुतनीकरणाने कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देणेत येत आहे.

कायम विना अनुदान

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, १ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अ करावा.

स्वाक्षरीवर शि. उ. सं. बांबी
सही असे,
पुणे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १ करिता

प्रतिलिपी -

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुणे करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थांविरुद्ध तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्य. शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना सविनय सादर.

३) निवडनस्ती

ABHINAV EDUCATION SOCIETY'S S. NO. 13, AMBEGAON (BK) PUNE 46. ENGLISH MEDIUM SCHOOL

PRINCIPAL
ABHINAV'S ENGLISH MEDIUM SCHOOL,
Ambegaon (Bk.), Pune-46.

TRUE COPY